कारागृह विभागातील कारागृह शिपाई (Sepoy) गट-क या पदाचे सेवा प्रवेश नियम, २००८ व २०१२ अधिक्रमित करुन पोलीस शिपाई सेवा प्रवेश नियम, २०११ नुसार सेवाप्रवेश नियमाप्रमाणे कारागृह शिपाई भरती प्रक्रिया राबविणे बाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः जेएलई-१०१५/१६६६/प्र.क्र.३०२/तुरुंग-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
दुसरा मजला, मंत्रालय-४०० ०३२.
दिनांक : १५ जानेवारी, २०१६.

<u>वाचा :</u>

१) गृह विभाग शासन निर्णय क्र.जेएलडी ३५९७/४९/प्र.क्र.२२९/ भाग-२/पीआरएस-१, दिनांक १२ सप्टेंबर, २००३.
२) गृह विभाग, कारागृह अधिनियम, १८९४ अधिसूचना, दिनांक ३१ जानेवारी २००८ व दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१२.
३) गृह विभाग, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ आदेश, दिनांक १६ जून, २०११.
४) गृह विभाग शासन निर्णय क्र. जेएलई-१०१५/ १६६६/ प्र.क्र.३०२/१५/ तुरुंग-१, दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१५.

प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्यातील पोलीस व कारागृह हे गृह विभागाच्या अखत्यारीतील विभाग आहेत. कारागृह विभागातील कारागृह शिपाई या पदाची भरती प्रक्रिया पोलीस शिपायांच्या भरती प्रक्रियेबरोबर पोलीस विभागामार्फत राबविण्याचे आदेश झालेले आहेत. तसेच, कारागृह विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांना पोलीस विभागातील समकक्ष पदांची वेतनश्रेणी पोलीस दलाप्रमाणे सेवा प्रवेश नियमात सुधारणा करण्याच्या अटींच्या अधीन राहून दिनांक ०४.०६.२००३ पासून लागू करण्यात आलेली आहे. तथापि, पोलीस शिपाई व कारागृह शिपाई यांचे सेवाप्रवेश नियमातील तरतुदीमधील असलेला फरक दूर केलेला नाही. पोलीस दलातील पोलीस शिपाई व कारागृह विभागातील कारागृह शिपाई या दोन्ही पदांची भरती प्रक्रिया एकत्रितरित्या राबविण्याकरीता कारागृह शिपाई सेवा प्रवेश नियमात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

कारागृह विभागातील कारागृह कायदा, १८९४ अधिसूचना, दिनांक ३१ जानेवारी २००८ व दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१२ ही अधिक्रमित करुन याद्वारे महाराष्ट्र शासन गृह विभागाच्या अखत्यारीतील व अस्थापनेवरील पोलीस शिपाई या पदाच्या सेवा भरतीकरीता अस्तित्वात असलेले मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ आदेश, दिनांक १६ जून, २०११ चे सेवा प्रवेश नियम कारागृह शिपाई गट-क यांचे भरतीकरीता लागू करणेत येत आहेत. पोलीस शिपाई या पदाच्या सेवा भरतीकरीता अस्तित्वात असलेल्या उक्त सेवा प्रवेश नियमात वेळोवेळी बदल झाल्यास तो बदल कारागृह शिपाई गट क यांच्यासाठीही लागू असेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११५१७२९२६५१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Jaysing L Pawara

Digitally signed by Jaysing L Pawara
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Jaysing L Pawara
Date: 2016.01.16 13:04:51 +05'30'

(ज.ल.पावरा)
उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.राज्यमंत्री (गृह / शहरे) यांचे खासगी सचिव
४) मा.राज्यमंत्री (गृह / ग्रामीण) यांचे खासगी सचिव
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८) महालेखापाल-१ व २ (लेखा परीक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
९) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०) अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे
११) अपर पोलीस महासंचालक (आस्थापना), मुंबई
१२) अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण), मुंबई,
१३) पोलीस आयुक्त, मुंबई / नवी मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर
१४) विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह), दक्षिण विभाग, मुंबई
१५) कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे / मध्य विभाग, औरंगाबाद / पूर्व विभाग नागपूर
१६) पोलीस अधीक्षक, ठाणे / पुणे / औरंगाबाद / नागपूर
१७) सर्व अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह / जिल्हा कारागृह / खुले कारागृह
१८) निवडनस्ती (तुरुंग-१) गृह विभाग